मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# तळेगाव-चाकण-शिक्रापूर दरम्यान उन्नत मार्गाला लवकरच मिळणार केंद्राची मंजुरी

## खासदार श्रीरंग बारणे यांचा यशस्वी पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी असते. अशीच परिस्थिती देहूरोड सेंट्रल चौक ते चांदणी चौक दरम्यान देखील असते. या मार्गांवरील कोंडी कमी करण्यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. त्यांच्या पाठपुराव्याला यश येत असून तळेगाव-चाकण-शिक्रापूर दरम्यान उन्नत मार्गाला केंद्राकडून लवकरच मंजुरी मिळणार आहे. याबाबत स्वतः केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत माहिती दिली आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. त्यात गुरुवारी (दि. २१) मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दोन महत्वाच्या रस्त्यांबाबत प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित केला. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ पासून तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ पासून देहूरोड सेंट्रल चौक-किवळे-वाकड-चांदणी चौक मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ ला जोडणाऱ्या मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार झाला आहे. मात्र अद्याप या मार्गांचे काम सुरु झालेले



नाही. यामुळे तळेगाव, चाकण, शिक्रापूर, पिंपरी-चिंचवड एमआयडीसी येथे जाणारी अवजड वाहने, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ कडे (मुंबई-बेंगलोर महामार्ग) जाणारी वाहने वाहतूक कोंडीत अडकून पडतात. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी या दोन्ही मार्गावरील कामाला मंजुरी कधी मिळेल आणि काम कधीपर्यंत सुरु होईल, असे बारणे यांनी आपल्या प्रश्नात म्हटले. खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रश्नाला केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तर दिले. नितीन गडकरी म्हणाले, पुणे-मुंबई मार्गासह तळेगाव-चाकण-शिक्रापूर या मार्गावर मोठ्या प्रमाणात रस्ते वाहतूक होते. या भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. या भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केंद्र सरकार काम करत आहे. तळेगाव-चाकण-शिक्रापूर या दरम्यान उड्डाणपुल बांधला जाणार आहे. त्याचे डिझाईन बनवण्यात आले असून त्याचा डीपीआर देखील तयार झाला आहे. तो डीपीआर दिल्ली येथे मंजुरीसाठी आला आहे. त्याला लवकरच मंजुरी दिली जाणार आहे. पुणे-अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर या मार्गावर नवीन द्रुतगती मार्ग बनवला जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने बनवलेल्या कार्पोरेशनला बीओटी तत्वावर या रस्त्याचे काम देण्याबाबत विचार सुरु आहे. याच दरम्यान तळेगाव-चाकण-शिक्रापूर दरम्यानचा देखील उन्नत मार्ग बनवला जाणार आहे. त्याला लवकरच मंजुरी दिली जाईल. तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गासह मुंबई-बेंगलोर महामार्गावर देहूरोड सेंट्रल चौक-रावेत-पुनावळे-चांदणी चौक या दरम्यानच्या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. त्याच अनुषंगाने बारणे यांनी आज लोकसभेत प्रश्न उपस्थित केला.

# आदेशापूर्वीच महाराष्ट्र वनविकास महामंडळाचे पालिकेला पत्र

## बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय वनविकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा आदेश

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेचे चिंचवड येथील बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य शासनाच्या वनविकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा आदेश देण्याच्या एक दिवस अगोदरच महामंडळाने महापालिका आयुक्तांना पत्र पाठवून ताबा मागितला आहे. मुख्यमंत्र्यांनी १२ डिसेंबर रोजी प्राणी संग्रहालय हस्तांतरित करण्याचे आदेश दिले. मात्र, ११ डिसेंबर रोजी महामंडळाने महापालिकेकडे ताबा मागितला आहे. चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये एमआयडीसीच्या सात एकर जागेमध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान व प्राणी संग्रहालय आहे. ३० डिसेंबर १९८९ रोजी या संग्रहालयाचे उद्घाटन झाले. सर्पोद्यान



व प्राणी संग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम २०१६ मध्ये हाती घेण्यात आले. विस्तारीकरणाचे काम सुरू असल्याने २५ डिसेंबर २०१७ पासून प्राणिसंग्रहालय नागरिकांसाठी बंद आहे. प्राणिसंग्रहालयाचा विषय हिवाळी अधिवेशनातही गाजला. गेल्या सहा वर्षांत विविध ३६ प्राणी व पक्ष्यांचा मृत्यू झाला आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप अधिवेशनात करण्यात आला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून, प्राणी संग्रहालय महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. प्राणी संग्रहालयाचे टप्पा एक व दोनचे काम पूर्ण झाले आहे. टपा तीनमधील कामाच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच सल्लागारही बदलण्यात आला आहे. केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाने ऑगस्ट २०२३ मध्ये केलेला पाहणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच, आयुक्तांशी चर्चा करून वन विकास महामंडळाला पत्र पाठविण्यात येणार आहे. त्यांच्यासोबत पुढील आठवड्यात बैठक घेण्याचे नियोजन आहे.

# पदपथांवर कोट्यवधींचा खर्च, तरीही पादचारी रस्त्यावरच!

## नागरिकांना रस्त्यावरून चालण्याशिवाय पर्याय उरलेला नाही

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील सुस्थितीतील रस्ते तोडून प्रशस्त पदपथ, सायकल मार्ग तयार केले जात आहेत. कोट्यवधींचा खर्च करून तयार केलेले पदपथ विक्रेते, दुकानदारांच्या साहित्यांनी व्यापलेले आहेत. त्यामुळे पदपथांना अतिक्रमणांनी विळखा घातला असून, पादचाऱ्यांना सेवा रस्त्यावरूनच चालावे लागत असल्याचे चित्र आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात रस्ते, पदपथ विकसित करण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यासाठी सुस्थितीतील रस्ते तोडून नव्याने तयार केले जात आहेत. अधिक रुंदीचे पदपथ बनवून सायकल मार्गाची भर घातली जात आहे. मात्र, हे पदपथ, सायकल मार्ग एकसलग नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सांडपाणी वाहिनीचे झाकण, पदपथावरील झाडे, वीजेचे खांब, बाके, कठडा, नामफलक असे अडथळे पार करीत ये-जा करताना पादचाऱ्यांना अक्षरशः अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत आहे. अनेक पदपथांवर दुकानदार, विक्रेते आणि वाहनचालकांनी अतिक्रमण केले आहे. नागरिकांना रस्त्यावरून चालण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्च करून निर्माण केलेल्या पदपथांचा उद्देश सफल होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पदपथांना अतिक्रमणांनी विळखा घातला असून, पादचाऱ्यांना सेवा रस्त्यावरूनच चालावे लागत असल्याचे चित्र आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात रस्ते, पदपथ विकसित करण्याचे धोरण अवलंबले आहे.



> “ नव्या संकल्पनेमुळे पादचारी, सायकलस्वारांना सुरक्षित मार्ग मिळणार आहे. त्यामुळे पायी, सायकलने ये-जा करणाऱ्यांची संख्या वाढणार आहे. वायू, ध्वनिप्रदूषणात घट होणार आहे. पदपथावरील अतिक्रमणे क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकाकडून हटवली जातात.
>
> **-प्रमोद ओंभासे,**
> सहशहर अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग.

# शिवणेपासून रावेतपर्यंत पवना नदीची जैवविविधता धोक्यात

## रावेत बंधाऱ्यातील पाण्यात रासायनिक घटकांच्या मात्रेने उच्चांक गाठला

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना नदीला शिवणे गावापासून रावेत बंधाऱ्यापर्यंत जवळपास २९ नाले मिळतात. त्यांद्वारे नदी खोऱ्यांतील गावांतील सांडपाणी थेट नदीत मिसळत आहे. त्यामुळे शिवणेपासून रावेतपर्यंत नदीचे प्रदूषण वाढत गेले आहे. त्यात नायट्रोजन, फॉस्फरस, कार्बन या रासायनिक घटकांचे प्रमाण अधिक आढळले आहे. परिणामी, शहरासाठी अशुद्ध जलउपसा होणाऱ्या रावेत बंधाऱ्यातील पाण्यात रासायनिक घटकांच्या मात्रेने उच्चांक गाठला आहे.

शिवाय, बंधाऱ्यापासून सांगवी-दापोडीतील मुळा नदी संगमापर्यंत पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाणच नगण्य असल्याने नदी जवळपास मृतावस्थेत गेली आहे. तिच्यासह जैवविविधता जिवंत राहण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. पवना नदीवरील पवना धरणातून शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र, त्यासाठी पावसाळ्यात धरण पूर्ण भरल्यानंतर सांडव्यातून आणि अन्य वेळी वीजनिर्मिती केंद्रातून नदी पात्रात विसर्ग केला जातो. ते पाणी रावेत येथील बंधाऱ्यात अडवले जाऊन अशुद्ध जलउपसा केला जातो. या केंद्रातून निगडी-प्राधिकरण सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रात वाहिन्यांद्वारे पाणी नेले जाते. तिथे प्रक्रिया करून शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा केला जातो. नदीतील पाण्याचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असून, त्याविरुद्ध पर्यावरण प्रेमींकडून पवनामाई जलदिंडी मोहीम गेल्या पाच-सहा वर्षांपासून राबवली जात आहे. त्यांना काही शाळा-महाविद्यालयांचेही सहकार्य लाभत आहे. विविध ठिकाणच्या पाण्याचे नमुने घेऊन पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी-चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी तपासले आहे. त्यांच्या अहवालानुसार नदी प्रदूषणाचे गांभीर्य लक्षात येते. नदी प्रदूषणमुक्तीसाठी या सर्व संस्थांतर्फे चळवळ उभी राहात आहे. त्याअंतर्गत गुरुवारी साळुंब्रेपासून किवळेपर्यंत बोटीतून प्रवास केल्यानंतर नदीच्या सानिध्यातील जैवविविधता व निसर्गातील सुंदरता दिसून आली. ती कायम टिकवण्यासाठी नदी काठ सुधारण्यापूर्वी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता दिसून आली. शिवणेपासून रावेतपर्यंत पवना नदीच्या दक्षिण बाजूस १४ व उत्तरबाजूकडून १५ नाले आहेत. यांत शिवणेवाडी (दोन), ओझरडे, पिंपळखुटे (दोन), उर्से, बेबडओहोळ (चार), धामणे (दोन), परंदवाडी (दोन), सोमाटणे, शिरगाव, गोडुंब्रे, गहुंजे (दोन), साळुंब्रे, सांगवडे, मामुर्डी (दोन), किवळे, रावेत (दोन), जांभे (दोन), रावेत बंधारा या नाल्यांचा समावेश आहे.



पवना नदी प्रदूषणाचे प्रमाण तपासण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणच्या पाण्याचे नमुने घेतले जातात. त्यात एका ठिकाणचे पाणी तपासण्यासाठी नदीच्या खोलीनुसार तीन स्तरातील आणि रुंदीनुसार तीन टप्प्यातील पाणी घेऊन एकत्र केले जाते. त्यानुसार त्यातील बीओडी (बायोकेमिकल ऑक्सिजन डिमांड), सीओडी (केमिकल ऑक्सिजन डिमांड), डीओ (डिझॉल्व्ह ऑक्सिजन) यांसह नायट्रोजन, फॉस्फरस, कार्बन व अन्य घटकांचे प्रमाण तपासले जाते.

# काही कोटी लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळेल

## मराठा आरक्षणाबाबत चंद्रकांत पाटील यांचे भाष्य

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी। उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे या वेळी उपस्थित होते. मनोज जरांजे पाटील यांनी दिलेली मुदत संपली आहे. विधीमंडळाचे अधिवेशनही संपले आहे. अधिवेशनात मराठा आरक्षणाबाबत काय चर्चा झाली असा प्रश्न माध्यमांकडून विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना पाटील म्हणाले, की की मनोज जरांगे पाटील आणि सरकारमधील संवाद उत्तम सुरू आहे. जरांगे यांनी मांडलेल्या बहुतांश मागण्या पूर्ण होत चालल्या आहेत. कुणबी प्रमाणपत्र मिळत नाही म्हणून जरांगे यांच्या उपोषणाची सुरुवात झाली. स्वतःचे कुणबी प्रमाणपत्र, मग कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र आणि आता सरसकट कुणबी प्रमाणपत्र अशा त्यांच्या मागण्यांचा प्रवास राहिला आहे. कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र मिळत नाही असे त्यांचे जे मत आहे, त्याबाबत त्यांचे आता बरेच समाधान झाले आहे, असे माझे मत आहे. आतापर्यंत काही लाख नोंदी सापडल्या आहेत. पण या नोंदी काही लपवून ठेवलेल्या नव्हत्या. साधारणपणे वैयक्तिक मागणी केल्यावर असे प्रमाणपत्र मिळते, पण समाज म्हणून प्रमाणपत्र मिळण्याची मागणी झाल्यावर सरकारने समिती नेमली. त्यामुळे आता काही कोटी लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळेल. म्हणून जरांगे पाटील समाधानी आहेत, असे पाटील म्हणाले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे या वेळी उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाने पुण्यातील आमदारांचे रिपोर्ट कार्ड मागवले आहे. त्यामुळे आमदार धास्तावल्याची चर्चा पुण्यातील राजकीय वर्तुळात आहे. या बाबत विचारले असता पाटील म्हणाले, की ग्रामपंचायत सदस्यापासून खासदारापर्यंत सर्वांचीच कामगिरी पक्षाकडून तपासली जात असते. अन्य पक्षांप्रमाणे निवडणुकीपुरती कामे न होता पूर्ण कार्यकाळ लोकांसाठी दिला जावा अशी पक्षाची भूमिका आहे. त्यामुळे केवळ पुण्यातच नाही, तर सगळीकडूनच कामगिरीचा अहवाल घेऊन तपासला जातो. खासदारांच्या निलंबनाचे पडसाद लोकसभा निवडणुकीत दिसतील असे पवार म्हणत असल्याच्या या प्रश्नावर पाटील म्हणाले, की आशावादी राहणे माणसाला दिलेला नैसर्गिक गुण आहे. तसाच तो पवारांमध्येही आहे. भाजपचे नेते आणि उच्च तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर गेल्या काही महिन्यात दोन वेळा शाई फेकीच्या घटना घडल्या होत्या. या दोन्ही घटनेनंतर ज्या ठिकाणी चंद्रकांत पाटील कार्यक्रमास जातात त्या ठिकाणी अधिकचा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येत असतो, ज्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये. आज फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक महोत्सवाला चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. त्यानंतर त्यांनी पत्रकाराशी संवाद साधत अनेक राजकीय घडामोडींबाबत भूमिका देखील मांडली. दरम्यान अंबेजोगाई येथील ३५ वर्षीय शिवराज मोहन ठाकूर या तरुणाने चंद्रकांत पाटील यांना स्पर्धा परीक्षा देणार्या तरुणांबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात तू कोण आहेस, पत्रकार नसशील तर बाजूला होण्यास चंद्रकांत पाटील यांनी सांगितले, संबंधित तरुणाची पोलिसांना चौकशी करण्यास सांगितले. पण या प्रकारामुळे चंद्रकांत पाटील यांचे प्रतिक्रिया देतांना लक्ष काहीसे विचलित झाल्याचे पहायला मिळाले.



### पत्रकार नसशील तर बाजूला हो

**» पत्रकाराशी संवाद साधत अनेक राजकीय घडामोडींबाबत भूमिका देखील मांडली. दरम्यान अंबेजोगाई येथील ३५ वर्षीय शिवराज मोहन ठाकूर या तरुणाने चंद्रकांत पाटील यांना स्पर्धा परीक्षा देणार्या तरुणांबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात तू कोण आहेस, पत्रकार नसशील तर बाजूला होण्यास चंद्रकांत पाटील यांनी सांगितले, संबंधित तरुणाची पोलिसांना चौकशी करण्यास सांगितले. पण या प्रकारामुळे चंद्रकांत पाटील यांचे प्रतिक्रिया देतांना लक्ष काहीसे विचलित झाल्याचे पहायला मिळाले. त्यानंतर चंद्रकांत पाटील हे पुढील कार्यक्रमासाठी मार्गस्थ झाले. पोलिसांनी त्या तरुणाची चौकशी करुन त्याला नंतर सोडून दिले.**

# पाच रुपयांचे दूध अनुदान अडकणार नियमांच्या चौकटीत

## खासगी संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान नाही

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी। दूधदराची कोंडी फोडण्यासाठी राज्य सरकारने, सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याची घोषणा केली आहे. पण, हे पाच रुपयांचे अनुदान सरकारी निकषाच्या चौकटीतच अडकून पडण्याची भीती आहे. शिवाय खासगी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना हे अनुदान मिळणार नाही, त्यामुळे हे अनुदान शेतकऱ्यांसाठी एक मृगजळ ठरणार आहे. राज्यभरातील विविध शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे राज्य सरकारने हिवाळी अधिवेशनात गायीच्या दुधाला प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला. मात्र, हे अनुदान नियमांच्या चौकटीतच अडकून पडण्याची शक्यता आहे. संबंधित शेतकऱ्याने सहकारी दूध संघाला दूध घातले पाहिजे. त्या संघाने २९ रुपये प्रति लिटर दर दिला तरच राज्य सरकारकडून पाच रुपये मिळणार आहेत. पाच रुपये मिळण्यासाठी सहकारी दूध संघाने दूध बील शेतकऱ्याच्या बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीने जमा गरजेचे आहे तसेच शेतकऱ्याचा आधार कार्ड आणि गायीचे एअर टॅगिंग म्हणजे गाईचे आधारकार्ड यांची ऑनलाइन जोडणी झालेली असणे गरजेचे आहे. तरच हे पाच रुपयांचे अनुदान मिळणार आहे. सरकारने ही घोषणा करताना सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांनाच लागू केली आहे. खासगी दूध संघाने दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना ही योजना लागू असणार नाही. त्यामुळे खासगी संघाना दूध पुरविणारे शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार आहेत. राज्यात संकलित होत असलेल्या एकूण दुधापैकी ७२ टक्के दुध खासगी दूध संघामध्ये संकलित होते. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील दुधापैकी ७२ टक्के दूध उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होणार आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांमध्ये असा अन्याय न करता राज्यातील सर्व दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान द्यावे व राज्यात ३.२/८.३ गुण प्रतिच्या दुधाला किमान ३४ रुपये दर मिळेल यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलावीत, अशी मागणी किसान सभा व दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केली आहे.



**“ सहकारी दुध संघाना दूध पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपयांचे अनुदान देतानाही सरकारने नेहेमीप्रमाणे अटी शर्तीचे अडथळे निर्माण केले आहेत. प्रामुख्याने जास्त दुध संकट असणाऱ्या अहमदनगर, पुणे, संभाजीनगर, सोलापूर, नाशिक जिल्ह्यामध्ये सहकरी दूधसंघ दुधाला सरासरी २६ ते २७ रुपये दर देतात. ते संघ आहे. असे संघ २९रुपये दर देऊ शकतील का हा मुख्य प्रश्न आहे. अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या गायीचे पशु जनगणने अंतर्गत एअर टॅगिंग झालेले असले पाहिजे व ते शेतकऱ्यांच्या आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.**

**– डॉ. अजित नवले, सरचिटणीस किसान सभा**

# पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार

## चारही धरणात दहा टक्के पाणीसाठा कमी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराचा पाणी पुरवठा आज बंद करण्यात आला आहे. देखभालीच्या कामासाठी चिंचवडमध्ये पाणी कपात करण्यात आली आहे. दुसरीकडे पाटबंधारे विभागाने पुणे महानगरपालिकेला (झींपश चींपळललरिश्र डेऔॅऑरींळेप) पाणी बचत करा अशा सुचना दिल्या आहेत. त्याल कारणही तसेच आहे, कारण पुण्याला पुरवठ करणाऱ्या चारही धरणात गतवर्षीपेक्षा यंदा कमी पाणी आहे. त्यामुळे जानेवारी महिन उजडायच्या आधीच पुणे शहरावर पाणी कपातीची टांगती तलवार आहे. पुणेकरांनी आतापासूनच पाणी जपून वापरायल सुरुवत करायल हवी. पुणे शहरात पाण्याची बचत करा, अशा सूचना पाटबंधारे विभागाने पुणे महानगरपालिकेला दिल्या आहेत. पुणे शहरात तूर्तास तरी पाणी कपातीचा निर्णय झाला नसला तरी धरणातील कमी झालेला एकूण पाणीसाठा चिंतेची बाब ठरू लागली आहे. चार धरणात ७८.४७ टक्के इतकेच पाणी शिल्लक आहे. गेल्यावर्षी हाच साठा ८८.४१ टक्के इतका होता. म्हणजेच, गतवर्षीपेक्षा दहा टक्के कमी पाणी चार धरणात आहे. पाणीसाठ्यावरुन येत्या काही दिवसात पाटबंधारे विभागासोबत पुणे महानगरपालिकेचे अधिकारी बैठक घेण्याची शक्यता आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी क्षेत्रात सुद्धा पाणीसाठा कमी झाल्यामुळे पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार कायम आहे. आगामी काळा निवडणुकीचा असल्यामुळे पाणी पुण्यात कपातीचे निर्णय शासनाला घेणं कितपत फायद्याचं राहणार आहे, हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे. मागील वर्षी आजच्या तारखेला असणारा एकूण चार धरणे मिळून पाणीसाठाः



८८.४१ टक्के इतक होता. या वर्षी आजच्या तारखेला असणारा एकूण ४ धरणे मिळून पाणीसाठाः ७८.४७ टक्के इतका आहे. यंदा राज्यात पाऊस हवा तितका पडला नाही, त्यामुळे धरणातील पाणीसाठाही मर्यादीत आहे. पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या चार धरणात गेल्यावर्षी पेक्षा दहा टक्के कमी पाणीसाठा आहे. त्यामुळे पुणेकरांवर आतापासूनच पाणी कपातीची टांगती तलवार आहे. यंदाच्या वर्षात मुबलक पाऊस न झाल्याने पुणेकरांवर पाणी संकट कोसळलं आहे. त्यामुळे पुण्यातील धरणं ही १०० टक्के भरली नाहीत. म्हणूनच उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. तसेच या पाण्याचे वापर देखील योग्य प्रमाणात करावा लागणार आहे. त्यामुळे पाणी जपून वापरा अन्यथा जानेवारीपासून पाणीकपात करण्याचा इशारा महापालिकेकडून जलसंपदा विभागाला देण्यात आला होता.त्यामुळे जानेवारी महिन उजडायच्या आधीच पुणे शहरावर पाणी कपातीची टांगती तलवार आहे. पुणेकरांनी आतापासूनच पाणी जपून वापरायल सुरुवत करायल हवी. पुणे शहरात पाण्याची बचत करा, अशा सूचना पाटबंधारे विभागाने पुणे महानगरपालिकेला दिल्या आहेत. पुणे शहरात तूर्तास तरी पाणी कपातीचा निर्णय झाला नसला तरी धरणातील कमी झालेला एकूण पाणीसाठा चिंतेची बाब ठरू लागली आहे. चार धरणात ७८.४७ टक्के इतकेच पाणी शिल्लक आहे. गेल्यावर्षी हाच साठा ८८.४१ टक्के इतका होता. म्हणजेच, गतवर्षीपेक्षा दहा टक्के कमी पाणी चार धरणात आहे. पाणीसाठ्यावरुन येत्या काही दिवसात पाटबंधारे विभागासोबत पुणे महानगरपालिकेचे अधिकारी बैठक घेण्याची शक्यता आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी क्षेत्रात सुद्धा पाणीसाठा कमी झाल्यामुळे पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार कायम आहे.

### पुण्यात पाण्याचा तुडवडा

**» पुण्यातील धरणं ही १०० टक्के भरली नाहीत. म्हणूनच उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. तसेच या पाण्याचे वापर देखील योग्य प्रमाणात करावा लागणार आहे. त्यामुळे पाणी जपून वापरा अन्यथा जानेवारीपासून पाणीकपात करण्याचा इशारा महापालिकेकडून जलसंपदा विभागाला देण्यात आला होता. पाणीसाठ्यावरुन येत्या काही दिवसात पाटबंधारे विभागासोबत पुणे महानगरपालिकेचे अधिकारी बैठक घेण्याची शक्यता आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी क्षेत्रात सुद्धा पाणीसाठा कमी झाल्यामुळे पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार कायम आहे. आगामी काळा निवडणुकीचा असल्यामुळे पाणी पुण्यात कपातीचे निर्णय शासनाला घेणं कितपत फायद्याचं राहणार आहे, हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे.**

# अतिरिक्त आयुक्तपदाच्या पदोन्नतीच्या बैठकीला अखेर मुहूर्त

## वाघमारे यांचा दोन वर्षाचा कार्यकाल शिल्लक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे महापालिकेच्या सेवेतील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने अतिरिक्त आयुक्त पदी नियुक्ती करण्यासाठी अखेर विभागीय पदोन्नती समितीची (डीपीसी) बैठकीचा मुहूर्त निषेध करण्यात आला आहे ही बैठक २७डिसेंबर रोजी होणार असल्याचे महा पालिकेला नगरविकास विभागातर्फे कळविण्यात आलेले आहे. दरम्यान, डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ही बैठक होणार होती ती अचानक रद्द करण्यात आलेली होती. डीपीसीने अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्त होण्यासाठी शहर अभियंता प्रशांत वाघमारे, मुख्य अभियंता श्रीनिवास कंदुल आणि सह आयुक्त उल्का कळसकर हे तिन्ही



अधिकारी पात्र असल्याचे निश्चित केले आहे. यापूर्वी डीपीसीती बैठक ५ डिसेंबर रोजी होणार होती. मात्र, आदल्या दिवशी सायंकाळी अचानक ही बैठक रद्द केली होती. त्यानंतर आता पुन्हा ही बैठक येत्या २७ डिसेंबर रोजी होणार आहे. या समितीची बैठक नगर विकासचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. पुणे महापालिका आणि पिंपरी चिंचवड पालिका आयुक्त व्हीडीओ कॉनफरसिंगदारे उपस्थित राहणार आहेत. महापालिकेतील या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी एक जण अतिरिक्त आयुक्त होऊ शकतो. यामध्ये वाघमारे यांचा दोन वर्षाचा कार्यकाल शिल्लक आहे. कंदुल यांची अवघे पाच महिने सेवा शिल्लक आहे. तर कळसकर यांची सेवा आणखीन सात वर्ष शिल्लक आहे. त्यामुळे या निवड समितीच्या बैठकीत नेमकी कोणाला पदोन्नती मिळणार याकडे लक्ष लागलेले आहे. पूर्वी डीपीसीती बैठक ५ डिसेंबर रोजी होणार होती. मात्र, आदल्या दिवशी सायंकाळी अचानक ही बैठक रद्द केली होती.